Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 05/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## बालकुमार साहित्यिक लीलावती भागवत



लीलावती भागवत या मराठीतल्या बालकुमार साहित्यिक होत्या. त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १९२० रोजी रायगड जिल्हातील रोहा येथे झाला. एस.एन.डी.टी. विद्यापीठातून १९४०साली त्यांनी पदवी संपादन केली. मराठी आणि हिंदी भाषांच्या शिक्षिका म्हणून त्यांनी काम केले. आकाशवाणी मुंबई केंद्रामध्ये त्यांनी वनिता मंडळ हा कार्यक्रम चालवला. या वनिता मंडळामुळे अनेक प्रतिभावंत स्त्रियांचा समाजाला परिचय झाला. आहारशास्त्रावर बोलण्यासाठी लीलावती पुष्कळदा वसुमती धुरू यांना बोलवायच्या. त्यातूनच वसुमती धुरू या पुढे मराठीतील पाकशास्त्राच्या नामवंत लेखिका म्हणून पुढे आल्या. पूर्वाश्रमीच्या लीला पोतदार यांचा विवाह भा.रा. भागवत यांच्याशी ९ मे १९४० रोजी झाला, आणि त्या लीलावती भागवत झाल्या. बालमित्र या मुलांसाठीच्या मासिकामध्ये त्यांनी त्यांच्या पतीसमवेत काम केले.

भा. रा. भागवत आणि लीलाताई या दोघांनी मिळून १९५१ मध्ये जेव्हा हे मासिक सुरू केले. त्यावेळी बँकेत त्यांच्या नावावर फक्त ३५० रुपये होते. वेळ आल्यास दागिने मोडू, परंतु मुलांसाठीचा हा उपक्रम चालू ठेवू, असा निर्धार लीलाताईंनी दाखविला. त्या काळात मुलांसाठी विशेष मासिके नव्हती. मुलांसाठी मासिके विकत घेण्याची पालकांची मनोवृत्तीही नव्हती. तरीही मुलांच्या वाचनाची भूक भागविण्यासाठी त्यांनी हे मासिक चालू ठेवले. नामवंत लेखकांचे लेखन आणि द.ग. गोडसे यांची चित्रे यांमुळे 'बालमित्र' खरोखरीच मुलांचा बालमित्र बनले. अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थेच्या उभारणीत लीलावती भागवतांनी मोठा वाटा उचलला. साहित्याबरोबरच संस्थात्मक कार्यातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. आपल्या वयाच्या नव्वदीनंतरसुद्धा त्या सक्रिय होत्या. त्या वयात त्यांचे 'मुलांसाठी दासबोध' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी २५ नोव्हेंबर २०१३ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 05, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401